गुप्तसेवा व इतर खर्च अंतर्गत पुरवणी मागणीची रक्कम वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्र. जेएलएम-०११८/प्र.क्र.१८/तुरुंग-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २७ मार्च, २०१८.

<u>वाचा</u> :- १. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.पूरक-२०१८/प्र.क्र.५६/अर्थ-३, दि. १७.०३.२०१८

२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८.०४.२०१७

३. अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, पुणे यांच्या कार्यालयाचे क्र. अपोमसंवकामनि/पुणे/कक्ष-८/प्र.क्र.२३१७/१०२६, दि. २९.०१.२०१८ चे पत्र.

<u>शासन निर्णय :-</u>

महाराष्ट्रातील कारागृहात मोठया प्रमाणावर अतिरेकी, नक्षलवादी, संघटित टोळीत गुन्हेगार तसेच गंभीर गुन्हा करणारे बंदी ठेवण्यात आलेले आहेत. त्यांच्याकडून कारागृहातून सामुहिक पलायन, कर्मचाऱ्यांवर हल्ले यासंबंधीचे कट आखून कारागृहांतर्गत सुरक्षेला धोका निर्माण करण्याचा प्रयत्न चालू असतो. अशा कारागृहामधील आतील बंद्याकडून माहिती काढण्याकरीता गुप्त सेवा निधीची आवश्यकता आहे. याकरीता रु. ५.०० लक्ष इतका निधी मुख्यलेखाशिर्ष २०५६ तुरुंग (योजनेतर योजना) (००१) संचालन व प्रशासन (००)(०१) कारागृह निरीक्षणालय (२०५६००२६) दत्तमत ४१ गुप्तसेवा खर्च या लेखाशिर्षाखाली तसेच ५०-इतर खर्च अंतर्गत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळास एस.टी वॉरंटची प्रलंबित रक्कम अदा करणेकामी रु.९१,३३,३२६/- इतका निधी खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे. सदरचा खर्च हा सन २०१७-१८ च्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

सदरची रक्कम आहरण व संवितरण करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक व महानिरिक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.०४.२०१७ च्या परिशिष्टात नमूद केलेल्या अटीस अधीन राहून प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३२७१३०१४४९१२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Siddharth Vidyadhar Dhandore

Digitally signed by Siddharth Vidyadhar Dhandore
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=18c12c8352414c8a8937fd0998c9ca8d81b7ea489acfd971bb6de950e8d1d54f, serialNumber=5d16166df09e111cba9c7d5e4e321b340111df7b21c5b0fff0be638e80ea9a1b,
cn=Siddharth Vidyadhar Dhandore
Date: 2018.03.27 13:03:36 +05'30'

(सि. वि. धांडोरे)

कक्ष अधिकारी, गृह विभाग

प्रत,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसवो, पुणे.
३. विशेष पोलीस महानिरीक्षक (मुख्यालय), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. सर्व कारागृह उपमहानिरीक्षक
५. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. महाव्यवस्थापक (वाहतूक) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई.
७. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
११.उप सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.कार्यासन अधिकारी, परिवहन-२, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३.अवर सचिव (अर्थसंकल्प-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.वित्त विभाग (व्यय-८/अर्थसंकल्प-११), मंत्रालय, मुंबई.
१५.निवड नस्ती, तुरुंग-२.